प्रेस नोट दि. १५/०१/२०१९

**आरोपी लोकसेवक राजेन्द्र रघुनाथ भुतेकर वय ५२ वर्षे व्यवसाय—नोकरी पद कनिष्ठ लिपीक नेमणुक— वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, लातूर यांनी २०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १,०००/— रुपये लाचेची रक्कम स्वीकारली.**

यातील मुळ तक्रारदार यांनी भविष्य निर्वाह निधीमधुन विनापरतावा दोन लाख रुपये मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल केला होता. सदर दाखल प्रस्तावावरुन भविष्य निर्वाह निधीमधुन दोन लाख रुपये लवकर काढुन देतो म्हणुन आलोसे राजेन्द्र भुतेकर यांनी तक्रारदार यांचेकडे **२०००/— रुपये** लाचेची मागणी करुन तडजोडीअंती **१,०००/— रुपये** लाचेची रक्कम घेण्याचे मान्य करुन सदर लाचेची रक्कम स्वत: स्वीकारली म्हणुन त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन शिवाजीनगर जि. लातूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिृया सुरु आहे.

सदर सापळा मा. पोलीस अधिक्षक श्री. संजय लाठकर लाप्रवि नांदेड परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोलीस निरीक्षक वर्षा दंडीमे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर यांनी आयोजीत केला. सापळा यशस्वी होण्यासाठी पोहेकॉ संजय पस्तापुरे, व्यकंट पडीले, पोना लक्ष्मीकांत देशमुख, चंद्रकांत डांगे, पोकॉ मोहन सुरवसे, नानासाहेब भोंग, शैलेश सुडे, विष्णु गुंडरे, सचिन धारेकर, दत्ता विभुते, प्रदिप स्वामी, मपोना शिवकांता शेळके यांनी परिश्रम घेतले.

पुढील तपास पोलीस निरीक्षक वर्षा दंडीमे हया करीत आहेत.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांना कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असेल तर **कृपया मा. श्री.संजय लाटकर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचा भ्रमणध्वनी क्र. ९९२३०२८१२२ या क्रमांकावर** व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर कार्यालयाचे खालील क्रमांकावर संपर्क करावा असे जाहीर अवाहन पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांनी केले आहे.

**भ्रमणध्वनी क्रमांक : 9923666644, 9422242080, 9657709841**
**दूरध्वनी क्रमांक : 02382-242674**
**टोल फ्री क्र. : 1064**

सविनय सादर

माणिक बेद्रे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर


कार्यालयीन संपर्क पत्ता:—
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर
जुने जिल्हाधिकारी कार्यालय कॅम्पस, रजिस्ट्री ऑफिसचे बाजुस, लातूर
ईमेल आयडी:— dyspacblatur@gmail.com


Scanned by CamScanner